केसरी

केसरी. पान ३ दि. १६ डिसेंबर १९८९



'सकाळ' रिलीफ फंडाच्यावतीने जुलै १९८९ मध्ये वाहून गेलेल्या राधानगरी तालुक्यातील कसबे वाळवा येथील रघुनाथ न्यू इंग्लिश स्कूलच्या नवीन इमारतीचा पायाभरणी समारंभ गुरुवारी झाला. हा समारंभ शिक्षणमहर्षि व्ही. टी. पाटील यांच्याहस्ते झाला. यावेळी श्रीफळ जिल्हाधिकारी शिवाजीराव देशमुख यांनी वाढविले. निळूभाऊ लिमये व संस्थेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# वृत्तपत्रांनी समाजाचे देणे द्यावे : व्ही. टी. पाटील

कोल्हापूर : समाजाचे आपणहि काही देणे लागतो ते आपण दिले पाहिजे या भावनेने वृत्तपत्रांनी समाजापर्यंत पोहोचण्याची आवश्यकता ज्येष्ठ शिक्षण प्रसारक व्ही. टी. पाटील यांनी गुरुवारी व्यक्त केली.

दैनिक 'सकाळ' आपद्ग्रस्त निधीच्यावतीने काल राधानगरी तालुक्यातील कसबा वाळवे येथील नुकत्याच आलेल्या महापुरात पडलेल्या शाळेच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ काल करण्यात आला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी शिवाजीराव देशमुख होते. याच समारंभात शिवाजी विद्यापीठाने डी. लिट. ही पदवी देऊ केल्याबद्दल व्ही. टी. पाटील यांचा ज्येष्ठ पत्रकार निळूभाऊ लिमये साठी प्रयत्न झाले पाहिजेत असे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षपदावरुन बोलताना श्री. देशमुख यांनी सकाळच्या उपक्रमाद्दल गौरवोद्गार काढले आणि नैसर्गिक आपत्तीने कोल्हापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यातील आपद्ग्रस्तांची फेरउभारणी करणे आव्हान आहे. शासकीय यंत्रणा त्यासाठी प्रयत्नशील आहे. तरीदेखील आपत्ती ओसरल्यानंतरच्या ५ महिन्याच्या काळानंतरहि साडेपाच हजार आपद्ग्रस्तांची घरे उभारण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही, अशीहि माहिती त्यांनी दिली.

दैनिक 'सकाळ' आपद्ग्रस्त निधीच्यावतीने निळूभाऊ लिमये दैनिक